नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/०९/२०२६ (गुरूवार )

.......................................................................................................

## बनावट कागदपत्रे तयार करून शेतकऱ्यांच्या नावावर भारतीय स्टेट बॅकेमधून ७३ कोटी ८२ लाख ९२ हजार ८५० रुपयांचे कृषी कर्ज घेवून फसवणुक करणाऱ्या आंतरराज्यीय अरोपीस अटक, आर्थिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात श्रीमती पुजा गायकवाड, पोलीस उपअधीक्षक ,आर्थिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या नेतृत्वात पोलीस निरीक्षक योगेश कामाले, आर्थिक गुन्हें शाखा, नागपुर ग्रामीण यांच्या पथकाने SBI मौदा आणि रामटेक येथून गरिब, अल्पशिक्षीत शेतकऱ्यांचे नावाने बनावट व खोटे कागदपत्रे तयार करुन करोडो रुपयांचे कृषी कर्ज उचल करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील आरोपी सचिन खुशाल कारेमोरे, वय ४० वर्षे,रा. नेरी तह. मोहाडी जि. भंडारा याला शिताफीने अटक केली आहे.**

सदर गुन्हयाची थोडक्यात हकीकत अशी आहे की, सचिन कारेमोरे हा एका आंतरराज्यीय टोळीचा सदस्य आहे.या टोळीतील सदस्य गरिब, अशिक्षीत आणि अल्पशिक्षीत शेतकऱ्यांना हेरुन शेती पिकांच्या नुकसान भरपाईसाठी शासनाकडून प्रतिवर्ष १०,०००/–. रुपये मोबदला मिळते, त्यासाठी SBI बॅकेत खाते उघडावे लागते असे सांगुन विश्वास संपादन करायचे आणि शेतकऱ्यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, ७/१२ उतारे मिळवून SBI बॅकेत शेतकऱ्यांना घेवून जात होते. बॅकेतील वेगवेगळया इंग्रजी भाषेतील कागदपत्रांवर शेतकऱ्यांच्या सहया घेवून त्यांचे नावावर लाखो रुपयांचे कृषी कर्ज उचल करायचे. या आरोपींच्या टोळींनी SBI बॅक मौदा येथून ५४,६९,४२,८५०/–रुपये आणि SBI बॅक रामटेक येथून १९,१३,५०,०००/–रुपयांचे कृषी कर्ज उचल केले व बनावट कंपन्या स्थापन करुन कर्ज रक्कम त्या कंपन्यांमध्ये ट्रान्सफर करुन उचल केली आहे. वरील प्रकरणांमध्ये पोलीस ठाणे मौदा व रामटेक येथे आतापर्यंत एकुण १६ आरोपीतांविरुध्द विवीध कलमान्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा

यांच्या आदेशान्वये सदर गुन्हयाचे तपास आर्थिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांना दिले होते.

या प्रकरणातील बहुतांश आरोपी हे विविध राज्यातील असल्याचे तपासामध्ये समोर आले आहे. पोलीस सर्व आरोपींचा शोध कसोशिने घेत आहे. आरोपी हे नियोजनबध्द पध्दतीने केंद्रीय प्राधिकरण वेअरहाऊसिंग डेव्हलपमेंट रेग्यूलेशन अथॉरेटी, दिल्ली (WDRA) यांचेकडून बनावट वेअरहाऊस परवाने मिळवित होते आणि त्या परवान्यांचे आधारे SBI बॅंके मध्ये खोटे व बनावट इलेक्ट्रॉनिक निगोशिएबल वेअर हाऊस रिसीट्स (eNWR) तारण ठेवून**''प्रोडयूस मार्केटींग लोन''** (PML) या योजनेमध्ये करोडों रुपयांचे कर्ज शेतकऱ्यांचे नावे उचल करीत असल्याचे पोलीस तपासामध्ये समोर आले आहे. सचिन कारेमोरे याच्या विरूध्द यापुर्वी सुध्दा भंडारा, गडचिरोली आणि अहेरी येथे धान घोटाळा प्रकरणात गुन्हयांची नोंद असल्याची माहीती प्राप्त झाली.

**सचिन कारेमोरे हा मागील अनेक महिन्यांपासून मिळुन येत नव्हता. मागील महिन्यातच मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी त्याचा अटकपुर्व जामीन रद्द केला. आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक त्याचा अनेक दिवसांपासून कसोशिने शोध घेत होते. दिनांक ०२/०९/२०२६ रोजी पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की, सचिन कारेमोरे हा नागपूर रेल्वे स्टेशन येथून राज्याचे बाहेर पळून जाण्याचे तयारीत आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने सापळा रचुन त्याचा पाठलाग करुन त्यास रेल्वे स्टेशन नागपूर परिसरातुन शिताफीने ताब्यात घेवून अटक केली आहे.**

## २४ तासच्या आत एटीएम फोडण्याचा प्रयत्न करणाऱ्या ०२ आरोपीतांना अटक, खापा पोलीसांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री सागर खर्डे, सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांच्या नेतृत्वात दिनांक ०२/०९/२०२६ रोजी खापा पोलीसांनी २४ तासाच्या आत गुन्हयाची उकल करत खापा पोलीस स्टेशन अंतर्गत एटीएम फोडीचा प्रयत्न करणाऱ्या २ आरोपींना अटक केले आहे.**

पोलीस स्टेशन खापा अंतर्गत दिनांक ०२/०९/२०२६ रोजी फिर्यादी नामे राकेश भिमराव वानखेडे, वय ३५ वर्षे, रा. २०३ गॅलेक्सी मेन्शन शिवशक्ती मानेवाडा

नागपूर यांनी पोलीस ठाणे, खापा येथे येवुन रिपोर्ट दिली की, दि. ०१/०९/२०२६ रोजीचे यातील आरोपीतांनी बॅक ऑफ बडोदा शाखा, खापा येथील मागच्या गल्लीत असलेले एटीएम मशीनचे समोरील पत्रा उघडे दिसत असल्याचे तसेच फोडण्याचा प्रयत्न तसेच पैसे चोरण्याचा प्रयत्न केल्याचे दिसत असल्याचे फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन खापा येथे कलम ३०५ (अ), ३०३ (२), ६२, ३(५) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

खापा पोलीस स्टेशनचे गुन्हे शोध पथकाचे अधिकारी आणि अंमलदार यांनी गुप्त बातमीदार आणि तांत्रिक पुराव्याच्या आधारे सदर गुन्ह्यात **आरोपी १) अमर बंडूजी सराटे, वय २२ वर्षे, रा. आजनी, ता. सावनेर २) प्रेम विनोद वानखेडे, वय १९ वर्ष, रा. गणेश मंदिर सावनेर आणि त्यांचा साथीदार ३) विधी संघर्षग्रस्त बालक यांनी मिळुन सदर गुन्हा केल्याचे निष्पन्न केले. आरोपीला ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी गुन्हा केल्याची माहीती दिली. सदर गुन्हयातील आरोपी क्र. १) व २) यांना दिनांक ०२/०९/२०२६ रोजी अटक करण्यात आली आहे.**



# आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पाशर्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील पोलीस स्टेशन खापा, केळवद, कन्हान, भिवापुर येथे आगामी गणेशोत्सव, श्रीकृष्ण जयंती, पोळा आणि इतर सणोत्सवांच्या आयोजकांच्या बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक ०१/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांनी पोलीस स्टेशन खापा येथे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आगामी साणोत्सवांच्या आयोजकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कन्हान :—** दिनांक ०२/०९/२०२६ रोजी पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांनी पोलीस स्टेशन कन्हान येथे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आगामी साणोत्सवांच्या आयोजकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन केळवद:—** दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक श्री आशिषसिंह ठाकुर ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन केळवद पोलीस स्टेशन केळवद येथे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आगामी साणोत्सवांच्या आयोजकांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन भिवापुर:—** दिनांक ०२/०९/२०२६ रोजी सहा पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मस्कर ,प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन भिवापुर यांनी पोलीस स्टेशन भिवापुर येथे पोलीस स्टेशनच्या हद्दीतील आगामी साणोत्सवांच्या आयोजकांची बैठक घेतली.

सर्व आयोजकांना विनापरवानगी गणेशमूर्तीची स्थापना करू नये, मंडप उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घ्याव्यात, महावितरणकडून विद्युत जोडणीसाठी आवश्यक परवानगी घ्यावी तसेच गणेश मंडपामुळे रस्त्यावरील वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. यावेळी दहीहंडी उत्सवासाठी आवश्यक परवानग्या घेणे, ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे पालन करणे, १४ वर्षाखालील मुलांचा सहभाग टाळणे, चार थरांपेक्षा अधिक मानवी मनोरे उभारू नये, तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता

घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच आगामी गणेशोत्सव, श्रीकृष्ण जयंती, पोळा आणि इतर सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले**










# २४ तासाच्या आत चोरीचा गुन्हा उघड, ०३ आरोपी अटक, पारशिवनी पोलीसांची कामगिरी

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०२/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी येथील तपास पथकाने सायबर पोलीस स्टेशन, नागपूर ग्रामीण यांच्या सहकार्याने तांत्रिक विश्लेषण, तसेच गोपनीय माहितीच्या आधारे तपास करून २४ तासाच्या आत बोकड चोरीचा गुन्हा उघड करून ०३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत दिनांक ०२/०९/२०२६ रोजी फिर्यादी नामे सुधाकर जानराव चापडे, रा. पालसावली, त. पारशिवनी यांनी पोलीस ठाणे पारशिवनी येथे येवुन रिपोर्ट दिली की, मौजा बच्छेरा शेत शिवारातील गोठ्यातील लोखंडी जाळी तोडून त्यांना एक बोकड किंमती १२,०००/— रुपये कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याचे फिर्यादीचे रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन पारशिवनी येथे कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.स. २०२३ अन्वये गुन्हा नोंद आहे.

**सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान पारशिवणी पोलीसांनी गोपनिय माहीती आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे अज्ञात आरोपी यांचा शोध घेतला असता, गुन्हयातील आरोपी नामे १) विलास हरी राऊत, वय ३२ वर्ष, रा. बिटोली ०२) स्वप्नील रमेश राऊत, वय २३ वर्ष, रा. बिटोली ०३) दीपक सुरेश कोहळे, वय ३२ वर्ष, रा. पालासावळी, ता. पारशीवणी हे असल्याचे निष्पन्न करुन त्यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे कौशल्यपुर्ण विचारपुस केली असता त्यांनी पोलीस स्टेशन पारशिवनी येथे बोकड चोरीचा गुन्हा केले असल्याची माहीती दिली. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. पोलीसांनी पंचासमक्ष गुन्हयात चोरीस गेलेला बोकड किंमती १२,०००/— रूपयांचा संपुर्ण मुद्देमाल जप्त केला आहे.**

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०४ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ५६ हजार २०० रूपयांचा मुद्देमाल जप्त कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— दिनांक ०२/०९/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा बोरगाव बरड येथे खुल्या जागेत काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कळमेश्वर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) अशोक उपासराव काळे, वय ४० वर्ष, रा. वॉर्ड क्र. ०२, बोरगाव ता. कळमेश्वर २) महेश लखन राऊत, वय २६ वर्ष, रा. वॉर्ड क्र. २ तोंडाखैरी ३) शंकर मनोहर जाधव, वय ३५ वर्ष, रा. वॉर्ड क्र. २, तोंडाखैरी ४) नितेश लक्ष्मण पंडे, वय ३७ वर्ष, रा. वॉर्ड क्र. ०२, बोरगाव बरड** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तास पत्ते आणि रोख रक्कम ६२००/—रूपये, ०४ मोबाईल किंमती ५०,०००/—रूपये असा एकुण ५६,२००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०८ गुन्हे नोंद

**दिनांक ०२/०९/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांनी अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक आणि सेवन करणाऱ्यांविरूद्ध नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण ०८ गुन्हे दाखल करण्यात आले.**

**पोलीस स्टेशन वडोदा** येथे महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे लोकेश उर्फ मोचु प्रभुनाथ गुप्ता, वय २८ वर्ष, रा. खदान नं. ३,

कन्हान याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** आरोपी लक्ष्मण नोपाल सहारे, वय ३९ वर्ष, रा. माथनी याचेवर १ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन अरोली अंतर्गत** आरोपी १) शत्रुगण शामदास तपासे, वय ४४ वर्ष, रा. अरोली वार्ड क्रं. ०५, ता. मौदा, जि. नागपुर २) अनिल हरीभाऊ टेकाम, वय ३३ वर्ष, रा. अरोली वार्ड क्रं. ०५, ता. मौदा, जि. नागपुर यांचेवर प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत** आरोपी प्रकाश केशवजी कारेमोरे, रा. खुरजगाव, ता. सावनेर जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा अंतर्गत** आरोपी तुषार हरदास मेश्राम, वय ३६ वर्ष, रा. चारगाव, ता. काटोल, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत** आरोपी सुनिल गिरमलाल राजपुत, वय ३४ वर्षे, रा. मसखापरा, ता. काटोल, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण २२,२३० मिली देशी दारू असा एकुण ९,८८०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**जनसंपर्क अधिकारी**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**